सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

# सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५

# मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३०

( दिनांक १० मार्च, २००५ पर्यंत सुधारलेला )

**Bombay Act No. XXV of 1930**

# THE BOMBAY LOCAL FUND AUDIT ACT, 1930

*(As modified upto 10th March, 2005)*

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय आणि ग्रंथागार, कोल्हापूर, यांच्याव्दारे भारतात मुद्रित आणि संचालक, सरकारी मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई-४, यांच्याव्दारे प्रकाशित

**2006**

[किंमत रु. ५-००]

# मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३०

अनुक्रमणिका

उद्देशिका

कलमे

१. संक्षिप्त नाव

२. व्याप्ती

३. व्याख्या

४. लेखापरीक्षेसाठी आपले लेखे सादर करण्याची स्थानिक प्राधिकरणांची जबाबदारी.

५. फर्माविण्यात येईल अशा एका किंवा अधिक कालावधीने लेखापरीक्षेसाठी लेखे सादर करणे.

६. दस्तऐवज सादर करण्यास व संबंधित व्यक्तींना हजर राहण्यास इ. फर्माविण्याचा लेखापरीक्षकाच अधिकार.

७. कलम ६ अन्वये केलेल्या मागणीची अवज्ञा केल्याबद्दल शास्ती.

८. राज्य शासन निदेश देईल अशा काही अधिकाऱ्यांकडे व मंडळांकडे लेखापरीक्षेचा अहवाल पाठवणे.

९. लेखापरीक्षा अहवालात कोणत्या गोष्टी समाविष्ट केल्या पाहीजेत.

१०. स्थानिक प्राधिकाऱ्याने दोष दुरुस्त करणे. कलम ८ अन्वये मुख्य लेखापरीक्षकांचा अहवाल आल्यानंतर अनुसरावयाची कार्यपद्धती.

११. अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे झालेले बेकायदेशीर प्रदान किंवा नुकसानीदाखल अधिक किंवा तेवढीच रक्कम वसूल करण्याचा आयुक्तास अधिकार असणे.

१२. दंडादाखल द्यावयाची अधिक किंवा तेवढीच रक्कम कशी वसूल करावी.

१३. दंडादाखल अधिक रक्कम किंवा तेवढीच रक्कम देण्याबाबत दिलेल्या आदेशाविरुध्द अर्ज.

१४. लेखापरीक्षकाच्या आदेशाच्या संबंधात झालेला खर्च स्थानिक निधीतून देणे.

१५. नियम.

१६. १९०१ चा मुंबई अधिनियम ३, १९२३ चा मुंबई अधिनियम ६ आणि १९२५ चा मुंबई अधिनियम १८ मधील सुधारणा (मुद्रित केलेल्या नाहीत).

१७. सन १९३३ चा मध्यप्रांत व वऱ्हाडचा अधिनियम क्र. ९ चे निरसन आणि व्यावृत्ती.

१८. स्थानिक प्राधिकाऱ्यांचा लेख्यांच्या तपासणीसंबंधीच्या इतर कोणत्याही कायद्याशिवाय आणखी या अधिनियमाच्या तरतुदी लागू असणे.

## सन १९१० चा मुंबई अधिनियम क्रमांक २५[१]

## [मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३०]*

[१७ सप्टेंबर, १९३०]

या अधिनियमात पुढील आदेश व अधिनियम या अन्वये अनुकलन, रुपभेद व सुधारणा करण्यात आल्या आहेत :--

भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश.
सन १९४९ चा मुंबई अधिनियम १२.
सन १९५० चा मुंबई अधिनियम ८.
विधि अनुकूलन आदेश, १९५०.
सन १९५५ चा मुंबई अधिनियम ९.
मुंबई विधी अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश , १९५६.
महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०
सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम ३.
सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम ५.
सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम ३५.
सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम २५.
सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम ४०.
सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम ३९.

**[२][ बृहन्मुंबई व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्यात] असलेल्या विवक्षित स्थानिक प्राधिकरणांच्या व्यवस्थापनाखाली किंवा नियंत्रणाखाली असलेल्या स्थानिक निधींची लेखापरीक्षा करण्यासाठी तरतूद करणे व अशा लेखापरीक्षेचे नियमन करणे यासाठी अधिनियम ;**

ज्याअर्थी [२][बृहन्मुंबई व्यतिरिक महाराष्ट्र राज्यात ] असलेल्या विवक्षित स्थानिक प्राधिकरणांच्या व्यवस्थापनाखाली किंवा नियंत्रणाखाली असलेल्या स्थानिक निधींची लेखापरीक्षा करण्यासाठी तरतूद करणे व अशा लेखापरीक्षेचे नियमन करणे इष्ट आहे ;

[३][ * * * * * ]

त्याअर्थी, याद्वारे पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :-

१. या धिनियमास मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० असे म्हणावे. संक्षिप्त नांव.

[४][२. हा अधिनियम बृहन्मुंबई व्यतिरिक्त संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे]. व्याप्ती.

---

[१] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी, **मुंबई शासन राजपत्र**, १९३०, भाग ५, पृष्ठे ४४-४९ पहा; प्रवर समितीच्या अहवालासाठी वरील राजपत्र, १९३०, भाग ५, पृष्ठे ११६--१२१ पहा; परिषदेतील कार्यवाहीसाठी मुंबई विधानपरिषद चर्चेच्या नोंदी, १९३०, खंड २८ व २९ पहा.

* सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम २ अन्वये हा अधिनियम बृहन्मुंबई व्यतिरिक्त महाराष्ट्र राज्याच्या उरलेल्या भागास लागू करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ आणि ४ याद्वारे "बृहन्मुंबई व्यतिरिक्त मुंबई इलाख्यात" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४ (२) द्वारे "आणि ज्याअर्थी" या शब्दांनी सुरू होणारा आणि" मिळविण्यात आली आहे" या शब्दांनी संपणारा मजकूर गाळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २ दाखल करण्यात आले.

व्याख्या ३. [१][(१)] या अधिनियमात, विषयात किंवा संदर्भात काहीही प्रतिकूल नसेल तर,--

(अ) "लेखापरीक्षक" म्हणजे, [२][मुख्य लेखापरीक्षक] किंवा या अधिनियमान्वये असलेली लेखापरीक्षेची कामे करण्यास [३][[४][राज्य] शासनाने] अधिकार दिलेली कोणतीही अन्य व्यक्ती ;

[५][ (अ-अ) "सभापती" याचा अर्थ [६][नागपूर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत त्या शहराचा नगरपालिका आयुक्त, [७][महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये स्थापन करण्यात आलेली जिल्हा परिषद किंवा पंचायत समिती यांच्या बाबतीत त्या अधिनियमात व्याख्या केल्याप्रमाणे मुख्य कार्यकारी अधिकारी] आणि इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या बाबतीत त्या प्राधिकरणाचा अध्यक्ष किंवा सभापती ] असा आहे ; आणि विसर्जित किंवा निष्प्रभावित स्थानिक प्राधिकरणाच्या बाबतीत अशा स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाराचा वापर करण्याकरिता व कर्तव्ये पार पाडण्याकरिता कायदेशीररीत्या नेमण्यात आलेली किंवा आलेल्या व्यक्ती ] ; (१९६२ चा महा. ५.)

[८][ (अअअ) "मुख्य लेखापरीक्षक" म्हणजे मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा आणि त्यात [९] [उप-मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक लेखापरीक्षक (वरिष्ठ) आणि] उप-मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, याचा समावेश होतो ; ]

[५][(अब) "तपशीलवार लेखापरीक्षा" म्हणजे संपूर्ण वर्षाच्या लेख्यांची लेखापरीक्षा ; ]

[१०][ * * * * *]

(क) "स्थानिक प्राधिकरण" म्हणजे मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४, कलम ३ खंड (२६) यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेले "स्थानिक प्राधिकरण" व त्यात [११][मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७] अन्वये रचना करण्यात आलेले शाळा मंडळ व [१२][महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या अधिनियम, १९६१ अन्वये रचना करण्यात आलेली पंचायत समिती] यांचा समावेश होतो. (१९०४ चा मुंबई १. १९४७ चा मुंबई ६१. १९६२ चा महा. ५.)

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ च्या कलम ६ अन्वये कलम ३ यास त्या कलमाचे पोटकलम (१) हा नवीन क्रमांक देण्यात आला व पोटकलम (२) दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६ (१) (अ) अन्वये "परीक्षक" या शब्दाऐवजी "मुख्य लेखापरीक्षक" हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन आदेशाद्वारे "प्रशासन" या मजकुराऐवजी "प्रांतिक शासन" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] १९५० च्या विधि अनुकूलन आदेशाद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ च्या कलम २ (१) द्वारे हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ कलम ६ (१) (ब) द्वारे "स्थानिक प्राधिकरणाचा अध्यक्ष किंवा सभापती" या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियमाच्या ३५ कलम ८० अनुसूचीद्वारे हा भाग नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात आले आहे.

[८] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ६ (१) (क) द्वारे खंड (अअअ) समाविष्ट करण्यात आला.

[९] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ च्या कलम २ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१०] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम ६ (१) (ड) द्वारे खंड (ब) वगळण्यात आला.

[११] वरील अधिनियमाचे कलम ६ (१) (इ) द्वारे "मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२३" या मजकुराऐवजी हा मजकूर घालण्यात आला.

[१२] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ८०, अनुसूची याद्वारे हा मजकूर नेहमीकरिता समाविष्ट करण्यात आल्याचे समजण्यात आले आहे.

(ड) "स्थानिक निधी" म्हणजे ज्या निधीवर नियंत्रण ठेवण्याचा किंवा ज्याची व्यवस्था पाहण्याचा स्थानिक प्राधिकरणास कायदेशीररीत्या हक्क आहे असा कोणताही निधी असा आहे, आणि त्यात अशा प्राधिकरणास जो बसविण्याचा कायदेशीरपणे हक्क आहे असा कोणताही उपकर, पट्टी, शुल्क किंवा कर यांच्या उत्पन्नाचा आणि अशा प्राधिकरणात निहित असलेल्या कोणत्याही मालमत्तेचा समावेश होतो ;

.२ चा . ५.

[१][ (इ) "खास लेखापरीक्षा" म्हणजे परिपूर्ण लेखापरीक्षेची आवश्यकता असलेल्या विनिर्दिष्ट बाबीची किंवा बाबींची लेखापरीक्षा.]

१९६१ चा महा. ३.

[२][ (२) मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा (व्याप्ती व सुधारणा) अधिनियम, १९६० याच्या प्रारंभानंतर या अधिनियमान्वये केलेला कोणताही नियम, कोणतीही आज्ञा किंवा आदेश यात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही संलेखात किंवा दस्तऐवजात स्थानिक निधी लेख्याचा परीक्षक किंवा स्थानिक निधी लेख्याचा सहायक परीक्षक यांच्याबद्दल केलेल्या कोणत्याही उल्लेखाचा अर्थ, तो मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा किंवा यथास्थिती उप-मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा यांचा उल्लेख असल्याप्रमाणे लावण्यात येईल.]

०४ चा ई १. ४७ चा ई ६१. ६२ चा ा. ५.

**लेखापरीक्षेसाठी आपले लेखे सादर करण्याची स्थानिक प्राधिकरणांची जबाबदारी.**

**४.** [३][[४][राज्य] शासनाने] [५]**[राजपत्रात]** अधिसूचना काढून ज्यांचे लेखे तपासले जाण्यास पात्र आहेत असे घोषित केले असेल अशा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाचे लेखे, अशा स्थानिक प्राधिकरणांची रचना ज्या अन्वये करण्यात आली असेल अशा कोणत्याही अधिनियमात किंवा त्या अन्वये केलेल्या कोणत्याही नियमात काहीही असले तरी सर्व बाबतीत या अधिनियमान्वये किंवा तदनुसार तरतूद केलेल्या रीतीने तपासले जाण्यास पात्र असतील.

**फर्माविण्यात येईल अशा एका किंवा अधिक कालावधीने लेखापरीक्षेसाठी लेखे सादर करणे.**

**५.** ज्यांचे लेखे या अधिनियमान्वये लेखापरीक्षा केली जाण्याच्या अधीन आहेत असे कलम ४ अन्वये घोषित केले असेल अशा प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाच्या [६][सभापतीने] आपल्या स्थानिक निधीचे सर्व लेखे कलम १५ अन्वये केलेल्या नियमात विहित केलेल्या रीतीने व तशा नमुन्यानुसार प्रतिवर्षी किंवा आयुक्त फर्मावील अशा कालावधीने लेखापरीक्षेसाठी लेखापरीक्षकास सादर केले किंवा करविले पाहिजेत.

---

[१] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ च्या कलम २(२) द्वारे हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ६ (२) द्वारे पोटकलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "शासन" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकार" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] १९५० च्या विधि अनुकूलन आदेशाद्वारे "प्रांतिक" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "मुंबई शासन राजपत्रात" या मजकुराऐवजी "शासकीय राजपत्रात" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ३ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

दस्तऐवज सादर करण्यास व संबंधित व्यक्तींना हजर राहण्यास इ. फर्माविण्याचा लेखापरीक्षकाचा अधिकार.

**६.** (१) या अधिनियमान्वये करावयाच्या कोणत्याही लेखापरीक्षेच्या प्रयोजनार्थ लेखापरीक्षकास--

[१][ (अ) त्यास योग्य वाटतील अशी लेख्याच्या संबंधातील प्रमाणके, विवरणपत्रे, विवरण, पत्रव्यवहार, टिप्पण्या किंवा इतर दस्तऐवज स्थानिक प्राधिकरणाच्या मुख्य कार्यालयाकडे सादर करण्यास लेखी फर्माविता येईल ; ]

(ब) [२][अशी प्रमाणके, विवरणपत्रे, विवरणे, पत्रव्यवहार, टिप्पण्या किंवा इतर दस्तऐवज] याबद्दल जबाबदार असणाऱ्या किंवा ते ज्यांच्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असतील अशा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही वेतनी सेवकास किंवा अशा स्थानिक प्राधिकरणाबरोबर किंवा त्याच्यामार्फत केलेल्या कोणत्याही करारात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे त्याचा स्वतःचा किंवा त्याच्या भागीदाराचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही व्यक्तीस अशा स्थानिक प्राधिकरणाच्या मुख्य कार्यालयात जातीने हजर राहून कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यास लेखी फर्माविता येईल ;

(क) स्थानिक प्राधिकरणाचा [३][*] सभापती किंवा अन्य मानसेवी अधिकारी किंवा सदस्य यांजकडून कोणत्याही स्पष्टीकरणाची आवश्यकता असेल त्याबाबतीत अशा स्थानिक प्राधिकरणाच्या मुख्यालयात आपणास भेटण्याविषयी अशा व्यक्तीस लेखी निमंत्रण देऊन बोलाविता येईल आणि ज्या मुद्याबाबत अशा व्यक्तीकडून स्पष्टीकरणाची आवश्यकता असेल तो मुद्दा लेखापरीक्षकाने लेखी विनिर्दिष्ट केला पाहिजे.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या कोणत्याही आज्ञापत्रात किंवा देण्यात आलेल्या कोणत्याही निमंत्रणात अशा आज्ञापत्राचे किंवा नियंत्रणाचे ज्या मुदतीत अनुपालन केले पाहिजे ती वाजवी मुदत निश्चित करता येईल.

[४][ * * * * *]

(३) लेखापरीक्षकाने ज्या तारखेस लेखापरीक्षेचे काम सुरू करण्याचे ठरविले असेल त्या तारखेसंबंधी कमीत कमी दोन आठवड्यांची लेखी नोटीस स्थानिक प्राधिकरणास दिली पाहिजे.

[५][परंतु या पोटकलमात काहीही अंतर्भूत असले तरी, लेखापरीक्षकास लेखी नमूद करावयाच्या विशेष कारणांसाठी दोन आठवड्यांहून कमी मुदतीची नोटीस देता येईल किंवा [६][राज्य शासन, आयुक्त किंवा मुख्य लेखापरीक्षक] यांजकडून मिळालेल्या प्राधिकारानुसार नोटीस दिल्यावाचून खास किंवा तपशीलवार लेखापरीक्षकांचे काम सुरू करता येईल.]

कलम ६ अन्वये केलेल्या आज्ञेची अवज्ञा केल्याबद्दल शास्ती.

**७.** जी कोणतीही व्यक्ती कलम ६, पोटकलम (१) खंड (अ) किंवा खंड (ब) अन्वये कायदेशीररीत्या तिला केलेल्या कोणत्याही आज्ञेचे पालन करण्यात जाणूनबुजून दुर्लक्ष करील किंवा तिचे अनुपालन करण्याचे नाकारील ती दंडाधिकाऱ्यापुढे सिद्धापराध ठरविण्यात आल्यानंतर शंभर रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडास पात्र होईल :

परंतु या कलमान्वये करावयाची कोणतीही कार्यवाही आयुक्तांच्या लेखी मंजुरीशिवाय दाखल करता कामा नये :

---

[१] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ४ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये "असे दस्तऐवज" या मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ द्वारे "अध्यक्ष" हा शब्द गाळण्यात आला.

[४] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ७ (१) द्वारे "ही मुदत" या शब्दांनी सुरू होणारा आणि "असता कामा नये" या शब्दांनी संपणारा मजकूर गाळण्यात आला.

[५] सन १९४९ चा अधिनियम क्रमांक १२, कलम ४ द्वारे हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ७(२) द्वारे "कमिशनर किंवा परीक्षक" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु आणखी असे की, अशी मंजुरी देण्यापूर्वी, आयुक्ताने, ज्या व्यक्तीविरुद्ध अशी कार्यवाही दाखल करावयाची असेल त्या व्यक्तीस अशी मंजुरी का देण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखविण्यास फर्माविले पाहिजे.

(२) पहिल्या वर्गाच्या दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाहून कमी दर्जाच्या अशा कोणत्याही न्यायालयाने या अधिनियमाविरुद्ध घडलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी करता कामा नये.

[4][राज्य] शासन निदेश देईल अशा काही अधिकाऱ्यांकडे व मंडळांकडे लेखापरीक्षेचा अहवाल पाठविणे.

**८.** [1][लेखापरीक्षेचे काम पूर्ण झाल्यानंतर व्यवहार्यतः शक्य असेल तितक्या लवकर परंतु त्यानंतर तीन महिन्यापेक्षा उशीरा नसेल अशा मुदतीत] [2][मुख्य लेखापरीक्षकाने] लेखापरीक्षा केलेल्या व तपासलेल्या लेख्यासंबंधी एक अहवाल तयार केला पाहिजे आणि तो संबंधित स्थानिक प्राधिकरणाकडे व [3][ [4][राज्य] शासन] निदेश देईल अशा अधिकाऱ्यांकडे व संस्थांकडे पाठविला पाहिजे.

लेखापरीक्षा अहवालात कोणत्या गोष्टी समाविष्ट केल्या पाहिजेत.

**९.** [5][मुख्य लेखापरीक्षकाने] आपल्या अहवालात पुढील गोष्टींसंबंधीचे एक विवरणपत्र समाविष्ट केले पाहिजे.-

(अ) जे प्रदान कायद्याविरुद्ध करण्यात आलेले आहे असे त्यास वाटते असे प्रत्येक प्रदान,

(ब) कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणुकीमुळे जी कोणतीही तूट किंवा जे कोणतेही नुकसान झाले आहे असे त्यास वाटेल अशा कोणत्याही तुटीची किंवा नुकसानीची रक्कम,

(क) एखाद्या व्यक्तीने तिला मिळालेली जी कोणतीही रक्कम लेख्यामध्ये दाखविणे आवश्यक होते परंतु जी अशी दाखविण्यात आली नसेल अशी रक्कम आणि,

(ड) वरील खंड (अ), (ब) आणि (क) मध्ये नमूद केलेल्या गोष्टींव्यतिरिक्त त्यास लेख्यांत आढळून आलेल्या कोणत्याही महत्वाच्या अनुचित किंवा नियमबाह्य बाबी.

स्थानिक प्राधिकाऱ्याने दोष दुरुस्त करणे. कलम ८ अन्वये [5][मुख्य लेखापरीक्षकाचा] अहवाल आल्यानंतर अनुसरावयाची कार्यपद्धती.

**१०.** [6][ (१) कलम ८ अन्वये अहवाल मिळाल्यानंतर अहवालात निदर्शनास आणून दिलेले असतील असे कोणतेही दोष किंवा नियमबाह्यता सभापतीने सुधारल्या पाहिजेत आणि अशा अहवालाच्या बाबतीत केलेल्या किंवा करण्याचे प्रास्ताविक केलेल्या कार्यवाहीसंबंधीचे निवेदन आणि त्याबाबतचे स्पष्टीकरण यासह तो अहवाल स्थानिक प्राधिकरणाच्या बैठकीपुढे मांडला पाहिजे. तसेच त्याने असा अहवाल मिळाल्यापासून [7][चार महिन्यांच्या] आत अशा अहवालात निदर्शनास आणून दिलेले कोणतेही दोष किंवा नियमाबाह्यता आपण सुधारल्याबद्दल [5][मुख्य लेखापरीक्षकास] कळविले पाहिजे किंवा असे दोष किंवा नियमाबाह्यता यांच्यासंबंधी अधिक स्पष्टीकरण देण्याची स्थानिक प्राधिकरणाची इच्छा असेल तर ते स्पष्टीकरण [5][मुख्य लेखापरीक्षकाला] उक्त मुदतीत त्याने पुरविले पाहिजे.

---

[1] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ८ द्वारे "परीक्षकाने" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे "शासन" या मजकुराऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] १९५० च्या विधी अनुकूलन आदेशाद्वारे "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[5] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ९ द्वारे "परीक्षक" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[6] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ६ द्वारे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[7] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम, क्रमांक ३ च्या कलमे १० (२) व १० (३) (अ) अन्वये "तीन महिन्याच्या" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) अशी माहिती किंवा स्पष्टीकरण मिळाल्यानंतर [१][मुख्य लेखापरीक्षकास] अहवालात चर्चा केलेल्या सर्व किंवा कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत.--

(अ) [२]****सभापतीने दिलेली माहिती किंवा स्पष्टीकरण स्वीकारता येईल आणि हरकत मागे घेता येईल, किंवा

(ब) त्या प्रकरणी लगत पुढील लेखापरीक्षेच्या वेळी किंवा त्याहून कोणत्याही आधीच्या तारखेस, पुन्हा तपासणी करण्याचा निदेश देता येईल, किंवा

(क) अहवालात निदर्शनास आणून दिलेले दोष किंवा नियमबाह्यता किंवा त्यापैकी कोणतेही दोष किंवा नियमबाह्यता दूर करण्यात किंवा सुधारण्यात आलेल्या नाहीत असा निर्णय देता येईल.

(३) पोटकलम १ मध्ये उल्लेख केलेली [२]*****सभापतीने पुरविलेली माहिती किंवा स्पष्टीकरण मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत किंवा [२]* * * * * सभापतीने अशी माहिती किंवा स्पष्टीकरण देण्यात कसूर केल्यास, उक्त पोटकलमात सांगितलेली [३][चार महिन्याची] मुदत संपल्या नंतर [१][मुख्य लेखापरीक्षकाने] आपल्या निर्णयाचा अहवाल आयुक्ताकडे पाठविला पाहिजे आणि [४][अशा अहवालाची एक प्रत त्याने सभापतीकडे पाठविली पाहिजे व अशा प्रतीत अहवालाचा जेवढा भाग पोट कलम (४) अन्वये प्रसिद्ध केला पाहिजे तो विशेषेकरून निर्दिष्ट केला पाहिजे.] जर कोणतेही दोष किंवा नियमबाह्यता दूर करण्यात किंवा सुधारण्यात आल्या नाहीत असा [१][मुख्य लेखापरीक्षकाने] निर्णय घेतला तर त्याने आपल्या अहवालात असे दोष किंवा नियमबाह्यता आपल्या मते यथानियम सुधारता येऊ शकतील किंवा कसे व ते तसे करणे शक्य असल्यास ज्या रीतीने तसे करता येईल ती रीत व असे दोष किंवा नियमबाह्यता यथानियम सुधारता येणे शक्य नसल्यास त्या क्षमापित करता येऊ शकतील किंवा कसे ते व तसे असल्यास कोणत्या प्राधिकाराने असे क्षमापन करता येईल या गोष्टी नमूद केल्या पाहिजेत. तसेच त्याने असे दोष किंवा नियमबाह्यता ज्या रकमांच्या संबंधात झालेल्या असतील त्या रकमांच्या बाबतीत त्याच्या मते अधिभारासह आकारणी करावी की नुसतीच आकारणी करावी हेही आपल्या अहवालात नमूद केले पाहिजे :

परंतु, शाळा मंडळाच्या व [५][[६][राज्य] शासनाने] याबाबत विशेषरित्या अधिसूचित केली असतील अशा स्थानिक प्राधिकरणांच्या लेखा अहवालांच्या बाबतीत या पोटकलमात उल्लेख केलेला अहवाल मुख्य लेखापरीक्षकाने [७][विभाग प्रमुखाकडे किंवा राज्य शासन निर्दिष्ट करील अशा अन्य अधिकाऱ्याकडे पाठविला पाहिजे. अशा अहवालात पोट-कलम (४) खाली प्रसिद्ध करावयाचा अहवालाचा भाग विशेषत: विनिर्दिष्ट केला पाहिजे.] अशा अधिकाऱ्याने उक्त अहवालातील पोट-कलम २,

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम १० (१) अन्वये "परीक्षक" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ६ द्वारे "अध्यक्षाने किंवा" हे शब्द वगळण्यात आले.

[३] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम १० (२) व १० (३) (अ) अन्वये तीन महिन्यांच्या या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९५५ च्या मुंबई अधिनियम क्रमांक ९ च्या कलम २ (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[५] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये "शासन" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलमे १० (३) (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

खंड (क) खाली येणारे जे कोणतेही दोष किंवा नियमबाह्यता निदर्शनास आणून दिल्या असतील त्यांच्या संबंधात आवश्यक ती उपाययोजना केली पाहिजे. ज्या रकमांच्या संबंधात असे कोणतेही दोष किंवा नियमबाह्य बाबी असतील त्या रकमांच्या ऐवजी अधिभारासह आकारणी करावी किंवा नुसतीच आकारणी करावी असे त्याचे मत असल्यास त्याने याबाबत केलेल्या आपल्या शिफारशींसह असा अहवाल आयुक्तांकडे पाठविला पाहिजे.

[१][परंतु आणखी असे की, ज्यास घेतलेला आक्षेप पोट-कलम (२), खंड (अ) अन्वये मागे घेण्यात आला नाही असा कोणताही दोष किंवा नियमबाह्य गोष्ट यामध्ये अंतभूर्त असलेली रक्कम---

(एक) दोनशे पन्नास रूपयांपेक्षा अधिक नसेल तर उप-मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा (वरिष्ठ) किंवा उप-मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, यास ;

(दोन) पाचशे रूपयांपेक्षा अधिक नसेल तर मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा, यांस, असा दोष किंवा नियमबाह्य गोष्ट क्षमापित करणे आवश्यक आहे असे वाटल्यास ती क्षमापित करता येईल. तथापि, अशा क्षमापनानंतर संबंधित अधिकाऱ्याने आपल्या अहवालामध्ये तशा आशयाची नोंद केली पाहिजे. ]

(४) संबंधित स्थानिक प्राधिकरणाने प्रसिध्द करावयाच्या आपल्या पुढील प्रशासनिक अहवालात पोट-कलम (२), खंड (क) खाली येणारे दोष किंवा नियमबाह्यता यांच्या संबंधी कलम ८ अन्वये केलेल्या अहवालात जेवढा भाग असेल तेवढा भाग, पोट-कलम (१) अन्वये त्याबाबत कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आलेले असेल तर ते स्पष्टीकरण व पोट-कलम (३) खाली त्यासंबंधी [२][मुख्य लेखापरीक्षकाने] सादर केलेला अंतिम अहवाल यांसह प्रसिध्द केला पाहिजे. दोष व नियमबाह्यता यांविषयीचा असा अहवाल व स्पष्टीकरण व अंतिम अहवाल हे, ते मिळाल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या मुदतीपर्यंत स्थानिक प्राधिकरणाच्या कार्यालयात सर्व लोकांस पाहण्यास खुले असले पाहिजेत. तसेच पोट-कलम (३) खाली आयुक्ताला पाठविलेल्या अहवालाची प्रत मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत स्थानिक प्राधिकरणाने [३][स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेत ज्याचा प्रसार आहे अशा, स्थानिक प्राधिकरणाने निवडलेल्या वर्तमानपत्रात मराठीमध्येही तो प्रसिध्द केला पाहिजे] :

[४][परंतु,

१९६५ चा महा. ४०. (एक) जे स्थानिक प्राधिकरण [५][ जिल्हा परिषद, पंचायत समिति किंवा महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५ याच्या अर्थानुसार "क" वर्गीय नगरपालिका क्षेत्राकरिता असलेली नगर परिषद नसेल व ज्याचे वार्षिक उत्पन्न एक लाख रुपयापेक्षा कमी परंतु पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक असेल, अशा स्थानिक प्राधिकरणास दोष व नियमबाह्यता यासंबंधीचा असा संपूर्ण अहवाल, स्पष्टीकरण व अंतिम अहवाल अशा वृत्तपत्रात अशा रीतीने प्रसिध्द करण्याऐवजी, त्याचा सारांश अशा वृत्तपत्रात [६][मराठीमध्ये] प्रसिध्द करता येईल ; आणि

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ च्या कलम ३ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम १० (१) द्वारे "परीक्षक" या शब्दाऐवजी हे शब्द बदली दाखल करण्यात आले.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० च्या कलम २ (१) (अ) अन्वयेमूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[४] सन १९५५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ च्या कलम २ द्वारे हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० च्या कलम २ (१) (ब) (एक) (अ) द्वारे वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २ (१) (ब) (दोन) (ब) द्वारे "प्रादेशिक भाषेतील" या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

(दोन) ज्याचे वार्षिक उत्पन्न पन्नास हजार रुपये किंवा त्यापेक्षा कमी असेल अशा स्थानिक प्राधिकरणाला, [१][जिल्हा परिषदेला, पंचायत समितीला किंवा अशा "क" वर्गीय नगरपरिषदेला], दोष व नियमबाह्यता यासंबंधीचा असा अहवाल, स्पष्टीकरण व अंतिम अहवाल वृत्तपत्रात अशा रितीने प्रसिद्ध करण्याऐवजी त्यांची प्रत त्यांच्या कार्यालयाच्या जागी व त्यास योग्य वाटेल अशा त्यांच्या हद्दीतील इतर ठळक जागी लावून [२][व अशी प्रत लोकांस पाहण्यासाठी त्याप्रमाणे लावण्यात आली आहे अशी एक नोटीस अशा वर्तमानपत्रात [३][मराठीमध्ये] देऊन] ती प्रसिध्द करता येईल].

[४][(५) सभापतीने पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेली माहिती किंवा खुलासा त्या पोट-कलमात निर्दिष्ट केलेल्या मुदतीच्या आत देण्यात कसूर केली तर, मुख्य लेखापरीक्षकाने ही गोष्ट आयुक्ताच्या निदर्शनास आणून दिली पाहिजे. त्यानंतर आयुक्तास मुख्य लेखपरीक्षकाने निर्दिष्ट केलेला किंवा आयुक्ताने निवडलेला कलम ८ अन्वये मुख्य लेखपरीक्षकाने सादर केलेल्या अहवालांचा भाग आयुक्तांने अशा अहवालावर दिलेल्या अभिप्रायासह [५][स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकारितेत प्रसार असलेल्या कोणत्याही वर्तमानपत्रात मराठीत प्रसिध्दकरता येईल]. अशा प्रसिध्द करण्याचा खर्च संबंधित स्थानिक प्राधिकरणाने ताबडतोब दिला पाहिजे. जर असा खर्च अशा रीतीने देण्यात आला नाही तर, अशा स्थानिक प्राधिकरणाचा अधिकारी, खजिनदार किंवा बँकर या नात्याने किंवा अन्याथा अशा स्थानिक प्राधिकरणाच्यावतीने कोणतेही पैसे जिच्या ताब्यात असतील अशा कोणत्याही व्यक्तीस अशा खर्चाची रक्कम त्याच्या हाती असलेल्या पैशातून किंवा वेळोवेळी त्यास मिळतील अशा पैशातून देण्याविषयी आयुक्ताला आदेशाद्वारे निदेश देती येईल. आणि असा आदेश पाळणे अशा व्यक्तींस बंधनकारक असेल. अशा आदेशानुसार जी रक्कम प्रत्येक वेळी देण्यात येईल त्यामुळे अशा व्यक्तीने अशा रीतीने तिच्या ताब्यात असलेल्या स्थानिक प्राधिकरणाच्या पैशातून दिलेल्या कोणत्याही रकमेबद्दल स्थानिक प्राधिकरणाऱ्या संबंधातील त्याच्या जबाबदारीतून त्यांची पूर्णपणे मुक्तता झाली आहे असे समजले पाहिजे :

परंतु आयुक्तास---

(एक) [६][पोटकलम (४) च्या परंतुकाच्या खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्थानिक प्राधिकरणाच्या] बाबतीत असे दोष व नियमबाह्यता याविषयीच्या अहवालाचा, खुलाशांचा व अंतिम अहवालाचा सारांश अशा कोणत्याही वर्तमानपत्रात [७][मराठीमध्ये] प्रसिध्द करता येईल, आणि

(दोन) [८][पोटकलम (४) च्या परंतुकाच्या खंड (दोन) मध्ये निर्दिष्ट केलेल्या स्थानिक प्राधिकरणाच्या] बाबतीत असे दोष व नियमबाह्यता यांविषयीच्या अहवालाची, खुलाशांची व अंतिम अहवालाची प्रत स्थानिक प्राधिकरणाच्या हद्दीतील, त्यास योग्य वाटेल अशा ठळक जागी ठेवावयास लावता येईल आणि अशी प्रत त्याप्रमाणे लोकांस पाहण्यासाठी ठेवण्यात आली आहे अशी नोटीस अशा वर्तमानपत्रात प्रसिध्द करविता येईल.

---

[१] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० याचे कलम २ (१) (ब) (दोन) (अ) व्दारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम १० (४) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २ (१) (ब) (दोन) (ब) द्वारे "प्रादेशिक" भाषेतील या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम १० (५) अन्वये पोटकलमे (५) व (५अ) बदली दाखल करण्यात आली.

[५] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० च्या कलम २ (२) (अ) अन्वये हे शब्द मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या पोटकलम २ (२) (ब) (एक) (अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (ब) (एक) (ब) अन्वये "प्रादेशिक भाषेत" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (ब) (दोन) द्वारे हा मजकूर मूळ मजकूराऐवजी बदली दाखल करण्यात आला.

(५अ) स्थानिक प्राधिकरणाने पोट-कलम (४) च्या तरतुदींचे पालन करण्यात कसूर केली तर, जणू काही पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेली माहिती किंवा खुलासा देण्यात कसूर झाली आहे असे समजून संबंधित अहवाल व खुलासे किंवा त्यांचे सारांश जेथवर पोट-कलम (५) च्या तरतुदी लागू असतील तेथवर त्या तरतुदींनुसार प्रसिध्द करविता येतील आणि पोट-कलम (५) च्या तरतुदी, आयुक्ताने अशा रीतीने प्रसिध्द करण्यांचा खर्च वसूल करण्याच्या बाबतीतही लागू होतील].

(६) [1][मुख्य लेखापरिक्षकाला] जी कोणतीही माहिती, दंडनीय, अपहार किंवा कपट, असत्याच्या समजुतीला दुजोरा देणारी वाटत असेल [2][ किंवा त्यांच्या मते जिच्यावर विषेश लक्ष केंद्रीत केले पाहिजे किंवा जिचे तात्काळ अन्वेषण करणे आवश्यक आहे अशी ती माहिती असेल तर], ती माहिती, आयुक्ताला आवश्यक वाटेल अशी कारवाई करण्यासाठी आयुक्ताच्या नजरेस आणुन देण्यास, [1][मुख्य लेखापरिक्षकाला] या कलमातील किंवा कलम ९ मधील कोणत्याही गोष्टीमुळे प्रतिबंध होणार नाही.

अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैर वर्तणुकीमुळे झालेले बेकायदेशीर प्रदान किंवा नुकसानी दाखल अधिक किंवा तेवढीच रक्कम वसूल करण्याचा आयुक्तास अधिकार असणे.

**११.** (१) [3][ कलम १०, पोट-कलम (ड) अन्वये मुख्य लेखापरीक्षकाच्या किंवा उक्त पोट-कलमाच्या पहिल्या परंतुकान्वये विभाग प्रमुखाच्या किंवा यथास्थिति इतर अधिकाऱ्यांच्या] शिफारशीचा विचार केल्यानंतर व संबंधीत व्यक्तींकडून खुलासा घेतल्यानंतर आयुक्तास बेकायदेशीर वाटणारी कोणतीही बाब नामंजूर करता येईल व ज्याने पैसे बेकायदेशीररीत्या दिले असतील किंवा देण्यास प्राधिकृत केले असेल त्या व्यक्तीवर अधिभारासह आकारणी करता येईल आणि कोणत्याही व्यक्तीच्या अक्षम्य हयगयीमुळे किंवा गैरवर्तणूकीमुळे आलेली कोणतीही तूट किंवा झालेली नुकसानी यांची रक्कम किंवा जी कोणतीही मिळालेली रक्कम लेख्यात दाखल करणे आवश्यक होते परंतु जी तशी दाखल करण्यात आली नसेल अशी रक्कम त्याबाबत जबाबदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीवर आकारता येईल, आणि त्याने अशा प्रत्येक बाबतीत अशा व्यक्ती कडून येणे असलेली रक्कम प्रमाणित केली पाहिजे:

परंतु,

[4][(एक) राज्याच्या मुंबई क्षेत्रातील स्थानिक प्राधिकरणाच्या बाबतीत १ एप्रिल १९३० पूर्वीच्या ;

(दोन) विदर्भ विभागातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या बाबतीत ८ ऑक्टोबर १९३२ पूर्वीच्या ; आणि

(तीन) इतर कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या बाबतीत १ एप्रिल १९६० पूर्वीच्या, कोणत्याही मुदतीच्या, कोणत्याही लेख्यात समाविष्ट असलेल्या, किंवा समाविष्ट करणे आवश्यक असून त्यातून वगळण्यात आलेल्या कोणत्याही बाबींसंबंधी या अधिनियमान्वये अधिक किंवा तेवढीच रक्कम वसूल करण्याबाबत आदेश देता कामा नये.]

[5][तसेच आयुक्तास बेकायदेशीर वाटेल अशा कोणत्याही बाबीच्या संबंधात कोणत्याही जिल्हापरिषदेने [6][किंवा कोणत्याही पंचायत समितीने] जो खर्च केला असेल अशा खर्चाच्या संबंधाने अधिभारासह आकारणी करण्याबाबत किंवा नुसतीच आकारणी करण्याबाबत आदेश देताना जिल्हापरिषदेने [6][किंवा कोणत्याही पंचायत समितीने] किंवा तिच्या आधिकाऱ्यांपैकी कोणत्याही अधिकाऱ्याने अशा कायद्याअन्वये तिला किंवा त्याला मिळालेले अधिकार चालवून केलेल्या खर्चाच्या योग्यतेविषयी किंवा अयोग्यतेविषयी आयुक्ताने प्रश्न उपस्थित करता कामा नये.]

---

[1] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ च्या कलम (१०) (१) अन्वये 'परीक्षकास' या शब्दाऐवजी हे शब्द बदली दाखल करण्यात आले.

[2] सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ च्या कलम ६ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ११ (१) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ११ (१) (ब) अन्वये "तारीख १ एप्रिल सन १९३० पूर्वीच्या" या मजकुराऐवजी वरील मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[5] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ चे कलम २८६, दहावी अनूसूची अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[6] सन १९६३ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ च्या कलम ८० अनुसूची अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) आयुक्ताने अधिभारासह आकारणी करावी की नुसतीच आकारणी करावी याबाबत आपण दिलेल्या निर्णयाची कारणे लेखी नमूद केली पाहिजेत आणि असा निर्णय ज्या व्यक्तीविरुद्ध दिला असेल त्या व्यक्तीस त्या निर्णयाची एक प्रत नोंदणीकृत डाकेने पाठविली पाहिजे.

(३) आयुक्तांच्या निर्णयाची प्रत पोट-कलम (२) अन्वये जिला पाठविण्यात आली असेल त्या व्यक्तीने ती स्वीकारण्याचे नाकारले तर, ज्या दिवसी तीने ती स्विकारण्याचे नाकारले असले त्या दिवसी ती तीला योग्य रितीने पोहोचली असे समजले पाहिजे.

[1][ (४) आयुक्ताने कलम १० पोट-कलम (३) अन्वये मुख्य लेखापरीक्षकाच्या किंवा कलम १०, पोट-कलम (३) च्या पहिल्या परंतुकान्वये विभाग प्रमुखाच्या किंवा यथास्थिती इतर अधिकाऱ्यांच्या शिफारशींचा विचार केल्यानंतर व संबंधित व्यक्तीकडून खुलासा घेतल्यानंतर किंवा त्यास आवश्यक वाटेल अशी अधिक चौकशी केल्यानंतर त्या बाबतीत आणखी उपाययोजना न करण्याचे ठरविल्यास त्याला त्याबद्दलची कारणे नमूद केल्यानंतर असा आक्षेप सोडून देता येईल आणि त्याने यासंबंधी यथास्थिती मुख्य लेखापरीक्षकास किंवा विभाग प्रमुखास किंवा इतर अधिकाऱ्यांस कळविले पाहिजे].

दंडादाखल द्यावयाची अधिक किंवा तेवढीच रक्कम कशी वसूल करावी.

**१२.** (१) कलम ११, पोट-कलम (१) अन्वये आयुक्ताने कोणत्याही व्यक्तीकडून येणे म्हणून प्रमाणित केलेली प्रत्येक रक्कम, अशा व्यक्तीने आयुक्ताचा निर्णय त्यास पोहोचल्यापासून एक महिन्याच्या आत, कलम १३ मध्ये विहित केल्याप्रमाणे न्यायालयाकडे किंवा [2][[3][राज्य] शासनाकडे] अर्ज केला नसेल तर, संबंधित स्थानिक प्राधिकरणाचे पैसे ज्या कोषागारात किंवा बँकेत ठेवण्यात येतात त्या कोषागारात किंवा बँकेत, भरली पाहिजे.

(२) उक्त रक्कम योग्य रीतीने भरण्यात आली नाही तर किंवा कलम १३, पोट-कलम (१) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आयुक्ताच्या निर्णयाविरुद्ध न्यायालयाकडे किंवा [2][[3][राज्य] शासनाकडे] अर्ज करण्यात आला असेल तर, न्यायालय किंवा [2][[3][राज्य] शासन] येणे म्हणून जी रक्कम ठरवील ती रक्कम, [4][जमीन महसुलाची थकबाकी म्हणून] वसूल करता येईल.

दंडादाखल अधिक रक्कम किंवा तेवढीच रक्कम देण्याबाबत दिलेल्या आदेशाविरुद्ध अर्ज.

**१३.** (१) कलम ११, पोट-कलम (१) अन्वये अधिभारादाखल अधिक किंवा तेवढीच रक्कम देण्याबाबत आयुक्ताने दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे आपल्यावर अन्याय झाला आहे असे समजणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस आयुक्ताचा निर्णय त्यास मिळाल्यापासून एक महिन्याच्या आत--

(अ) असा आदेश रद्द करण्याविषयी जिल्हा न्यायालयाकडे अर्ज करता येईल आणि त्या न्यायालयास त्यास आवश्यक वाटेल असा पुरावा घेतल्यानंतर, अधिभारादाखल द्यावयाची अधिक किंवा तेवढीच रक्कम कायम करता येईल, तीत फेरबदल करता येईल किंवा ती माफ करता येईल व परिस्थितीनुसार त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे खर्च देण्यासंबंधी आदेश देता येईल, किंवा.

---

[1] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ च्या कलम ११ (२) अन्वये पोट-कलम (४) दाखल करण्यात आले.

[2] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये 'शासन' या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये 'प्रांतिक' या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल करण्यात आला.

[4] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम १२ अन्वये मुळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) अशा अर्जाऐवजी [1][ [2][राज्य] शासनाकडे ] अर्ज करता येईल व राज्य शासनाने त्याबाबत त्यास योग्य वाटतील असे आदेश दिले पाहिजेत.

[3][(२) अर्जाची सुनावणी करणाऱ्या प्राधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटल्यास, अर्जाचा निकाल लागेपर्यंत प्रमाणपत्रानुसार चालवावयाची सर्व कामे स्थगित करता येतील.]

लेखापरीक्षकाच्या आदेशाच्या संबंधात झालेला खर्च स्थानिक निधीतून देणे.

**१४.** कलम ६, पोट-कलम (१) अन्वये लेखापरीक्षकाने दिलेला कोणताही आदेश पाळण्यासाठी स्थानिक प्राधिकरणाने केलेला सर्व खर्च त्याच्या स्थानिक निधीतून दिला पाहिजे.

नियम.

**१५.** (१) [1][ [2][राज्य] शासनास ] या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी [4][**शासकीय राजपत्रात** अधिसूचना देऊन] या अधिनियमांशी विसंगत नसतील असे नियम करता येतील :

[5][परंतु, राज्य शासनास या कलमान्वये सामान्यपणे सर्व स्थानिक प्राधिकरणांकरिता किंवा विशेषेकरून स्थानिक प्राधिकरणांच्या कोणत्याही वर्गाकरिता संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या किंवा प्राधिकरणांच्या क्षेत्रातील किंवा क्षेत्राच्या संबंधातील खास किंवा स्थानिक परिस्थिती लक्षात घेऊन किंवा विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा इतर कारणांकरिता नियम करता येतील आणि राज्य शासनास त्या सारख्याच कारणासाठी स्थानिक प्राधिकरणांच्या कोणत्याही वर्गास सर्वसामान्य नियमांच्या कोणत्याही तरतुदीच्या कक्षेतून वगळता येईल.]

(२) विशेषेकरून आणि वरील अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाधा येऊ न देता अशा नियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींबाबत तरतूद करता येईल :--

(अ) या अधिनियमान्वये ज्यांचे लेखे तपासले जाण्यास पात्र आहेत त्या स्थानिक प्राधिकरणाचे लेखे ज्या रीतीने व ज्या नमुन्यानुसार ठेवले पाहिजेत व सादर केले पाहिजेत ती रीत व तो नमुना ;

(ब) लेखापरिक्षकाचे अधिकार व कर्तव्ये आणि लेखापरीक्षेसाठी त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती आणि अशी तपासणी ज्यावेळी करण्यात आली पाहिजे त्या वेळा ; आणि

(क) या अधिनियमान्वये प्रसिद्ध करावयाच्या सर्व गोष्टी ज्या रीतीने प्रसिद्ध केल्या पाहिजेत ती रीत.

(३) या कलमान्वये करावयाचे नियम पूर्वप्रसिद्धीच्या शर्तींच्या अधीन असतील. [6][या कलमान्वये केलेले सर्व नियम ते करण्यात आल्यानंतर शक्य होईल तितक्या लवकर राज्य विधान मंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे तीस दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीसाठी ठेवले पाहिजेत आणि ज्या अधिवेशनात ते अशा रीतीने ठेवण्यात आले असतील त्या किंवा त्याच्या लगतनंतरच्या अधिवेशनात राज्य विधान मंडळ त्यात जे फेरफार करील अशा फेरफारांस अधीन असतील.]

---

[1] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये "शासन" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९६१ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम १३ अन्वये पोट-कलम (२) बदली दाखल करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १४ (१) (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम १४ (१) (ब) अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १४ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१६. [कलम १६ अन्वये केलेल्या सुधारणा मुख्य अधिनियमामध्ये समाविष्ट केल्या आहेत.]

सन १९३३ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्र. ९ चे निरसन आणि व्यावृत्ती.

[1][१७. राज्याच्या विदर्भ विभागात हा अधिनियम अंमलात आल्यानंतर त्या विभागास लागू असलेला मध्यप्रांत व वऱ्हाड स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३३ हा निरसित होईल. सन १९३३ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम ९.

परंतु तो अधिनियम अशा प्रकारे निरसित केल्यामुळे--

(अ) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमाचा पूर्वीचा अंमल ; किंवा

(ब) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमान्वये संपादन केलेला कोणताही हक्क किंवा पत्करलेले कोणतेही दायित्व ; किंवा

(क) अशा रीतीने निरसित केलेल्या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदी विरुद्ध केलेल्या कोणत्याही अपराधाच्या संबंधात झालेली कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा किंवा;

(ड) उपरोक्त, कोणताही हक्क, दायित्व, शास्ती, जप्ती किंवा शिक्षा याबाबतचे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना;

यांस बाधा येणार नाही आणि जणू हा अधिनियम अंमलात आला नव्हता असे समजून असे कोणतेही अन्वेषण, कायदेशीर कारवाई किंवा उपाययोजना दाखल करता येईल, चालू ठेवता येईल किंवा अंमलात आणता येईल आणि अशी कोणतीही शास्ती, जप्ती किंवा शिक्षा करता येईल ;

तसेच, मागील परंतुकास अधीन राहून अशा रीतीने रद्द केलेल्या अधिनियमान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा केलेली कोणतीही कृती (तीत केलेली कोणतीही नेमणूक किंवा प्रत्यायोजन किंवा दिलेले प्रतिवृत्त काढलेली अधिसूचना, दिलेला आदेश, दिलेली सूचना किंवा दिलेला निदेश, केलेला नियम, मिळवलेले प्रमाणपत्र किंवा दिलेली परवानगी यांचा समावेश होतो) ही या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर ती या अधिनियमाच्या तत्सम तरतुदीन्वये केलेली गोष्ट किंवा केलेली कृती आहे असे समजले पाहिजे, आणि या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही गोष्टीद्वारे, किंवा केलेल्या कोणत्याही कृतीद्वारे ती रद्द करण्यात आली नसेल तर किंवा रद्द करण्यात येईपर्यंत त्याप्रमाणे अंमलात असण्याचे चालू राहील.

स्थानिक प्राधिकाऱ्याच्या लेख्यांच्या तपासणीसबंधीच्या इतर कोणत्याही कायद्याशिवाय आणखी या अधिनियमाच्या तरतुदी लागू असणे.

१८. या अधिनियमाच्या तरतुदी कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या लेखापरीक्षेची तरतूद करणाऱ्या त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या जोडीने असतील व त्यांच्यामुळे अशा कायद्याच्या तरतुदींचे अल्पीकरण होणार नाही.

[1] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३ च्या कलम १५ अन्वये कलमे १७ व १८ ही दाखल करण्यात आली.

एच ४८-६,०८२ पु.-११.२००६

शासकीय मुद्रणालय, कोल्हापूर